परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र. : ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Exam Co-ordination Section
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय २००

दिनांक : १५/०५/२०२५

## परिपत्रक

मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था (पदव्युत्तर अभ्यासक्रम) यांना कळविण्यात येते की एप्रिल/मे २०२५ परीक्षेपासून अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी (एम.ई. प्रबंध) ( **M.E. Dissertation**) मूल्यमापन पध्दती ही पारंपारिक पध्दती ऐवजी ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आलेली आहे. यासंदर्भात दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी झूम ॲपवर बैठक घेण्यात आलेली आहे, सदर बैठकी मध्ये झालेल्या चर्चेनुसार व प्रबंध मूल्यमापनासंबंधी ऑनलाईन पध्दतीच्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार कालमर्यादित परीक्षा होवून वेळेत निकाल जाहीर करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

१. अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रबंध ( **M.E. Dissertation**) मूल्यमापन एप्रिल/मे २०२५ परीक्षेपासून ऑनलाईन पध्दतीने परिक्षक नेमणूक करण्यात येईल.
२. सदर अभ्यासक्रमाच्या प्रबंध मूल्यमापनासाठी प्रत्येक महाविद्यालयाने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी तीन परीक्षकांची नावे सविस्तर तपशीलासह ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या वेळेत भरणे आवश्यक आहे.
३. प्रत्येक शिक्षकास/मार्गदर्शकास कमाल ०८ विद्यार्थी मान्य असतील.
४. विद्यार्थ्यांनी पब्लीकेशन प्रसिध्द केलेले असल्यास दिलेल्या टॅबवर अपलोड करावे.
५. महाविद्यालयाकडून ऑनलाईन पध्दतीने परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर खालील पध्दतीने प्राधान्यक्रम निश्चित केला जाईल.

क. संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष — महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली परीक्षकांची नावे कायम ठेवणे/त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार त्यांना राहतील. अध्यक्ष अभ्यासमंडळ यांनी त्यांच्या लॉगीनमधून प्राप्त झालेल्या तारखेपासून पुढील दोन दिवसात त्या नावांमध्ये कायम ठेवणे/बदल करणे आवश्यक आहे.

ख. मा. अधिष्ठाता — संबंधीत अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांनी त्यांच्या लॉगीन मधून आवश्यक ती कार्यवाही केल्यानंतर संबंधीत विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी त्यांच्या लॉगीनमध्ये नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांची नावे कायम ठेवणे/त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

ग. मा. प्र—कुलगुरु — मा. अधिष्ठाता यांच्या लागीन मधून आवश्यक ती कार्यवाही केल्यानंतर मा. प्रकुलगुरु यांनी त्यांच्या लॉगीनमध्ये परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांच्या नावास मान्यता देणे आवश्यक आहे.

घ. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ — वरील क्रमानुसार संबंधीतांनी त्यांच्या लॉगीनमधून कार्यवाही केल्यानंतर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या लॉगीनमध्ये परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांच्या नावास प्राधान्यक्रम देवून संबंधीत परीक्षकांची नावे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडून संबंधीत महाविद्यालयास कळविण्यात येतील.

च. संबंधीत महाविद्यालये — प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावासमोर प्राधान्यक्रमानुसार देण्यात आलेल्या परिक्षकांच्या प्राधान्य क्रमांका नुसार क्रमांक १ वरील परीक्षक यांची संबंधीत महाविद्यालयाने नियुक्ती करावी. जर अनु. क्रमांक १ वरील परीक्षक त्या वेळेत उपलब्ध नसल्यास त्यापुढील क्रमांक २ वरील परीक्षक यांची नियुक्ती करावी. अनु. क्रमांक १ व २ परीक्षक त्या वेळेत उपलब्ध नसल्यास अनु. क्रमांक ३ वरील परीक्षकाची नियुक्ती करावी व विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे नमूद केलेल्या सर्व संबंधित अधिकारमंडळातील अधिकारी यांनी त्यांच्या लॉगीन मधून त्यांना नावे प्राप्त झाल्यापासून दोन दिवसात आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा क्रमाने सदरची नावे पुढील अधिकार मंडळाच्या /अधिका–याच्या लॉगीनमध्ये नावे (Automated system) स्वयंचलीत पध्दतीने पाठविली जातील.

छ. महाविद्यालय स्तरावर प्रबंध मूल्यमापन झाल्यानंतर विद्यापीठाच्या संबंधीत लिंक वर सर्व विद्यार्थ्यांचे गुण निर्धारित वेळेत महाविद्यालयांच्या संबंधीतांनी भरावेत.

आपला,

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ